**राज्यातील भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांच्या नोंदणी, प्रचार, प्रसिद्धी व मुल्यसाखळी विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य योजना**

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ**

प्लॉट नं. आर-७, मार्केट यार्ड,

गुलटेकडी, पुणे – ४११०३७

फोन क्र. ०२०-२४५२८१००/२४५२८२०० ईमेल: export@msamb.com

**प्रस्तावना :**

एखाद्या भौगोलिक प्रदेशातील वैशिष्ठ्यांमुळे, हवामान, संस्कृतीमुळे, एखाद्या उत्पादनात, त्याच्या उत्पादन प्रक्रियेत अनेक वर्ष दर्जा, चव, रंग, वास उतरत असतील, ते वर्षानुवर्ष कायम राहत असतील, तर अशा उत्पादनांची नोंदणी भौगोलिक निर्देशन नोंदणी कार्यालय चेन्नई येथे करता येते. यामुळे अशा उत्पादनांना दहा वर्षे इतर प्रदेशातल्या अनधिकृत उत्पादनांपासुन, भेसळ होणे, रास्त किंमतीपेक्षा कमी किंमत मिळणे यासारख्या गोष्टींपासुन संरक्षण मिळते व परत संरक्षण कालावधी वाढवता येतो. यामुळे या प्रदेशातील स्थानिक उत्पादकांना अधिकाधिक आर्थिक लाभ मिळण्याची संधी उपलब्ध होत असते.

भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादनांच्या अधिक उत्पादनांसाठी तसेच या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये कृषि विभागातर्फे आणि महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक प्रकल्प या अंतर्गत एकुण २४ कृषी उत्पादनांना भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त झाले आहे. या एकुण २४ कृषी उत्पादनाकरीता राज्यामध्ये २७ उत्पादकांच्या संस्था कामकाज करीत आहेत.

राज्यामध्ये कृषी उत्पादनाकरीता भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात कामकाज झाले असले तरी शेतक-यांना भौगोलिक चिन्हांकन/मानांकन बाबत माहीती करुन देणे यामुळे होणारे फायदे, उत्पादनासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती, उत्पादनाची प्रत, पॅकिंग, वापरावयाचा लोगो व या सर्वांकरीता नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त संस्था यांचेकडे आवश्यक मनुष्यबळ आणि आर्थिक परिस्थिती नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन संदर्भातुन प्रचार प्रसिद्धी करणे, त्या कृषीमालाच्या उत्पादकांच्या संस्थेकडे शेतक-यांची, निर्यातदारांची, प्रक्रियादारांची नोंदणी करणे, तसेच त्यांचे कृषीमालाची बाजारसाखळी विकसित करणे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत योजना राबविणे प्रस्तावित होते.

**निर्णय**

भौगोलिक चिन्हांकन/मानांकन बाबतची माहीती शेतक-यांपर्यंत पोहोचवणे, शेतक-यांची नोंदणी करणे तसेच या शेतमालाची विक्री व्यवस्था / निर्यात याबाबत कामकाज करण्याची गरज आहे. त्याकरीता नोंदणी करावयाच्या संस्था आणि कृषी पणन मंडळ सदरील कामकाज करेल. त्यासाठी भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादनाचे प्रचार, प्रसिध्दी, नोंदणी व बाजारसाखळी विकसित करणे यासाठी खालीलप्रमाणे ४ स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१) भौगोलीक चिन्हांकन/ मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार व प्रसिध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनासाठी अनुदान योजना.

२) भौगोलीक चिन्हांकन/ मानांकन नोंदणीसाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्याकरिता नोंदणी शुल्कासाठी अनुदान योजना.

३) भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन नोंदणी प्राप्त उत्पादनांचे मुल्यसाखळी विकसीत करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान योजना.

४) कृषी पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव उपक्रमामधील भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरिता अर्थसहाय्य योजना.

उपरोक्त चारही योजनांचे प्रस्ताव संबंधित संस्था/शेतकरी यांनी कार्यक्षेत्र लक्षात घेवुन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत.

**योजना निहाय निकष, अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

## योजना क्र. १. भौगोलीक चिन्हांकन/ मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार व प्रसिध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनासाठी अनुदान योजना.

**उददेश-** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन संदर्भातील माहिती सर्व घटकांपर्यंत पोहचवणे, उत्पादकांना नोंदणीसाठी प्रोत्साहीत करणे व नोंदणीचे आवश्यकतेबाबतची माहिती उत्पादकांना देणे.

**लाभार्थी-** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणा-या संस्था.

**लाभाचे स्वरुप -** एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजनासाठी कमाल मर्यादा रु. १०,००० प्रति प्रशिक्षण (किमान १०० शेतक-यासाठी) (प्रशिक्षण साहित्य व अनुषंगीक खर्चासाठी) या मर्यादेत अनुदान देय.

**कालावधी** : १ दिवस

**पात्रतेचे निकष-**

१. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादकांचे मालकी हक्क असणा-या संस्थेमार्फत पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे सादर करावा.

२. त्यासोबत कार्यक्रमाचा दिनांक, वेळ, ठिकाण तसेच मार्गदर्शकांची सूची सोबत जोडावी.

३. पूर्वमान्यता असणा-या संस्थेस कार्यक्रमासाठी अनुदान देय राहील.

४. अनुदान मागणीचा अंतिम प्रस्ताव कार्यक्रमानंतर ३० दिवसांचे आत कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय यांस सादर करावा.

५. योजना महाराष्ट्र राज्यासाठी मर्यादीत राहील.

६. अनुदान मागणी अर्ज मंजुर करणे अथवा पुर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ यांना राहतील.

७. सर्व २४ उत्पादने मिळुन खालील प्रमाणे कमाल कार्यक्रम मर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

| कार्यक्षेत्र | कार्यक्रम संख्या |
|---|---|
| तालुका | ३ |
| जिल्हा | १५ |

**आवश्यक कागदपत्रे-**

| पुर्व मागणी प्रस्ताव | अंतिम प्रस्ताव |
|---|---|
| १. पूर्व मान्यता मागणी अर्ज.<br>२. प्रस्तावीत कार्यक्रमाचे ठिकाण, वेळ, दिनांक व वक्ते या बाबत तपशील.<br>३. मागणी करणारी संस्थेचे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी हक्क बाबत GI Registry चे प्रमाणपत्र<br>४. अटी व शर्ती मान्य असल्याचे संस्थेचे हमीपत्र<br>५. लाभार्थी संस्थेचे बँक तपशिल - पासबुक झेरॉक्स प्रत | १. अनुदान मागणी अर्ज.<br>२. कार्यक्रम अहवाल.<br>३. उपस्थितांची यादी (नाव, गाव, मो.नं., पिकाचे नाव, क्षेत्र, सही इ.) व फोटो.<br>४. संस्थेने केलेल्या खर्चाची बिले.<br>५. पुर्व मान्यता पत्राची प्रत |

**योजना क्र.२. भौगोलीक चिन्हांकन/ मानांकन नोंदणीसाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्याकरिता नोंदणी शुल्कासाठी अनुदान योजना.**

**उद्देश** – भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणीसाठी शेतक-यांना प्रोत्साहीत करणे.

**लाभार्थी** – शेतकरी उत्पादक. (भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणा-या संस्थेचे माध्यमातुन)

**स्वरुप** – भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन नोंदणीसाठी शासकिय नोंदणी शुल्कापोटी येणा-या खर्चाचे ५० % अथवा प्रती लाभार्थी कमाल रु. ८०० मर्यादेपर्यंत अनुदान शेतक-यांसाठी संबंधित कृषी उत्पादनाचे मालकी असणा-या संस्थेला देण्यात येईल.

**पात्रतेचे निकष** –

१. शेतक-यांनी भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणी केलेली असावी व नोंदणी क्रमांक प्राप्त झालेला असावा.
२. शेतक-याचे ७/१२ उता-यावर पिकाची नोंद आवश्यक.
३. योजना महाराष्ट्र राज्यासाठी मर्यादीत राहील.
४.अनुदान मागणी अर्ज मंजुर करणे अथवा पुर्णपुणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ यांना राहतील.

**प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे** –

१. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणा-या संस्थेचा अर्ज.
२. संबंधित शेतकऱ्यांचे अर्ज
३. शेतक-यांचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
४. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणा-या संस्थेचा बँक तपशील.
५. संस्थेचे हमीपत्र

उपरोक्त कागदपत्रासह प्रस्ताव संस्थेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाचे आत कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे सादर करावा.

**योजना क्र. ३. भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन नोंदणी प्राप्त उत्पादनांचे मुल्यसाखळी विकसीत करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान योजना.**

**उद्देश:** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन नोंदणीकृत नैसर्गिक गुणवत्ता असलेली उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहचवणे, भेसळीला प्रतिबंध करणे, विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात उत्पादीत होणारी उत्पादने चिन्हासह विक्री करणेसाठी बाजार विकासाकरिता (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) अर्थसहाय्य करणे.

**लाभार्थी** - भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणारी संस्था.

**स्वरुप** – उत्पादनांच्या बाजार विकासाकरिता (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) येणाऱ्या खर्चाच्या ५०% जास्तीत जास्त ३,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य कृषी उत्पादनाचे मालकी असणा-या संस्थेला देण्यात येईल.

**निकष** –

१. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणाऱ्या संस्थेने उत्पादनांच्या बाजार विकासाकरिता सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ. पैकी कामकाज करणे बंधनकारक आहे.
२. लाभार्थी संस्थेने पुर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. पुर्वमान्यता असेल तरच अनुदानास पात्र राहील.
३. उपरोक्त नमुद कामकाजासंदर्भात विस्तृत माहिती व त्याचा उत्पादनाच्या बाजार विकासाकरिता कसा परिणाम होईल, प्रस्तावित लाभार्थी शेतकरी संख्या याबाबत माहिती सादर करणे बंधनकारक असेल.
४. सदर कामकाज करुन घेण्याकरिता संबंधित सेवापुरवठादार कंपनी / संस्थेचे कामकाजाच्या विस्तृत तपशिलासह दरपत्रके सादर करणे बंधनकारक असेल.
५. एकापेक्षा अधिक कामाकरिताचे दरपत्रकामध्ये कामनिहाय रक्कम नमुद करावी.
६. विवीध कामाकरिता एकापेक्षा जास्त सेवादार असतील तर तसा उल्लेख प्रस्तावामध्ये करावा.
७. अनुदान मागणीचा अंतीम प्रस्ताव कामकाज पुर्ण झाल्याच्या १ महिन्याचे आत कृषी पणन मंडळाचे संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.
८. एका संस्थेस एका वर्षात फक्त एकदाच सदर योजनेचा लाभ मिळेल.
९. अनुदान मागणी अर्ज मंजुर करणे अथवा पुर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ यांना राहतील.

| **पुर्व मान्यतेचा प्रस्ताव** | **अनुदान मागणी प्रस्ताव** |
|---|---|
| १. अर्ज<br>२. मागणी करणारी संस्थेचे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी हक्क बाबत GI Registry चे प्रमाणपत्र<br>३. अटी व शर्ती मान्य असल्याचे संमतीपत्र<br>४. कामकाजासंदर्भात विस्तृत माहिती व त्याचा उत्पादनाच्या बाजार विकासाकरिता कसा परिणाम | १. मागणी अर्ज<br>२. पुर्वमान्यतेचे पत्र<br>३. सेवापुरवठादार कंपनी / संस्थेने केलेल्या कामकाजाचे फोटोसहीत विस्तृत तपशिलासह अहवाल<br>४. सेवापुरवठादार यांचेकडुन केलेल्या कामाचे देयक |

| | |
|---|---|
| होईल, प्रस्तावित लाभार्थी शेतकरी संख्या, कामकाज पुर्ण होण्याचा कालावधी याबाबत माहिती.<br>५. सेवापुरवठादार कंपनी / संस्थेचे कामकाजाच्या विस्तृत तपशिलासह दरपत्रके<br>६. लाभार्थी संस्थेचा बँक तपशिल - पासबुक झेरॉक्स प्रत | ५. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी संस्थेने सेवापुरवठादार यांना अदा केलेल्या रकमेचा उल्लेख असलेबाबत सेवापुरवठादाराचे बँक पासबुक / स्टेटमेंट ची सत्यप्रत.<br>६. अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र. |

**योजना क्र. ४. कृषी पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव उपक्रमामधील भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरिता अर्थसहाय्य योजना.**

**उद्देश:** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविणे.

**लाभार्थी** - भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन मालकी असणारी संस्था.

**स्वरुप** – प्रति स्टॉल रु. ३०००/- अर्थसहाय्य.

**निकष** –

१. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादकांचे मालकी हक्क असणा-या संस्थेमार्फत पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे सादर करावा.

२. पूर्वमान्यता असणा-या संस्थेलाच अनुदान देय राहील.

३. पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव योजनेअंतर्गत असलेल्या स्टॉलकरिता अर्थसहाय्य उपलब्ध होईल.

४. सदर स्टॉलमध्ये भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणी केलेल्या शेतक-यांचाच माल विक्रिसाठी ठेवावा.

५.अनुदान मागणीच्या अंतीम प्रस्तावासोबत स्टॉलमध्ये सहभागी शेतकरी, त्यांच्या विक्री झालेल्या मालाच्या विवरण स्टॉलच्या फोटोसह सादर करावा.

६.अनुदान मागणीचा अंतीम प्रस्ताव प्रदर्शनाच्या अंतिम तारखेपासुन १ महिन्याचे आत कृषी पणन मंडळाचे संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

७.अनुदान मागणी अर्ज मंजुर करणे अथवा पुर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ यांना राहतील.

| **पुर्व मान्यतेचा प्रस्ताव** | **अनुदान मागणी प्रस्ताव** |
|---|---|
| १. संस्थेचा अर्ज<br>२. शेतकऱ्यांचे अर्ज (भौगोलिक चिन्हांकन / मानांकन अंतर्गत नोंदणी क्रमांकासह)<br>३. मागणी करणारी संस्थेचे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी हक्क बाबत GI Registry चे प्रमाणपत्र<br>४. अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र<br>५. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादकांचे मालकी हक्क असणा-या संस्थेचा बँक तपशिल - पासबुक झेरॉक्स प्रत | १. मागणी अर्ज<br>२. पुर्वमान्यतेचे पत्र<br>३. स्टॉलमध्ये सहभागी नोंदणीकृत शेतकरी / माल पुरवठादार नोंदणीकृत शेतकऱ्याची यादी<br>४. त्यांच्या विक्री झालेल्या मालाचे विवरण<br>५. स्टॉलचा फोटो |

## जिल्हे व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संबंधीत विभागीय कार्यालये:

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव व पत्ता | समाविष्ट जिल्हे |
|---|---|---|
| १ | उपसरव्यवस्थापक,<br>आंबा निर्यात सुविधा केंद्र,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>कृषी उत्पन्न बाजार समिती रत्नागिरी.<br>रत्नागिरी –नाचणेरोड, शांतीनगर,<br>रत्नागिरी- ४१५ ६३९<br>फोन नं. – ०२३५२ २२८३७७<br>ई- मेल –divrtn@msamb.com | रत्नागिरी, रायगड, सिधुदुर्ग, ठाणे, पालघर, मुंबई |
| २ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>पंचवटी, मार्केटयार्ड, दिंडोरी नाका<br>नाशिक - ४२२ ००३<br>फोन नं. – ०२५३ २५१२१७६<br>ई- मेल –divnsk@msamb.com | नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, अहमदनगर |
| ३ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>नविन कॉटन मार्केटयार्ड,<br>एस.टी. स्टॅण्ड समोर, गणेशपेठ,<br>नागपुर- ४४० ०१८<br>फोन नं. – ०७१२२७२२९९७<br>ई- मेल –divnag@msamb.com | नागपुर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपुर |
| ४ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>आंबा डाळिंब सुविधा केंद्र,<br>प्लॉट न डी-१/१ एम.आय.डी.सी. वखार मंडळाचे<br>गोदाम समोर बार्शी रोड,<br>लातुर- ४१३ ५३१<br>फोन नं. – ०२३८२ २१२०६१<br>ई- मेल –divltr@msamb.com | लातुर, बीड, उस्मानाबाद, नांदेड |
| ५ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>जुने कॉटन मार्केटयार्ड ,<br>अमरावती – ४४४ ६०१<br>फोन नं. – ०७२१ २५७३५३७<br>ई- मेल - divawati@msamb.com | अमरावती, अकोला, यवतमाळ वाशिम, बुलढाणा |
| ६ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, | औरंगाबाद, हिंगोली, परभणी, जालना |

| | | |
|---|---|---|
| | प्लॉट न -५/८ पिसादेवीरोड,<br>नवामोंडा वखार महामंडळ गोदामाजवळ ,<br>जाधववाडी,<br>औरंगाबाद – ४३१ ००७<br>फोन नं. – ०२४० २३३४१६८<br>ई- मेल –divabad@msamb.com | |
| ७ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>व्दारा - महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघ कार्यालय मार्केटयार्ड,<br>पुणे – ४११ ०३७<br>फोन नं. –०२० २४२६१२५१<br>ई- मेल –divpun@msamb.com | पुणे, सोलापुर |
| ८ | उपसरव्यवस्थापक,<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,<br>बाजार समिती मल्टीपर्पज हॉल इमारत,<br>कोल्हापुर – ४१६ ००५<br>फोन नं. – ०२३१ २६५०१६६<br>ई- मेल –divpun@msamb.com | सातारा, सांगली, कोल्हापुर |

## महाराष्ट्रातील भौगोलिक चिन्हांकनमानांकन प्राप्त उत्पादने व मालकी असणाऱ्या संस्था

| अ.क्र. | उत्पादन | कार्यक्षेत्र | संस्था |
|---|---|---|---|
| १ | महाबळेश्वर स्ट्रॉबेरी | महाबळेश्वर | श्रीराम फ्रुट प्रोसेसिंग को.ऑ. सोसायटी ली. |
| २ | नाशिकची द्राक्षे | नाशिक | नाशिक ग्रेप फार्मस सोसायटी |
| ३ | नागपुरची संत्री | नागपुर | डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ |
| ४ | आजरा घनसाळ तांदुळ | आजरा तालुका, जि. कोल्हापुर | आजरा तालुका शेतकरी विकास मंडळ |
| ५ | वायगाव हळद | वर्धा | वायगाव हळद उत्पादक संघ |
| ६ | मंगळवेढा ज्वारी | मंगळवेढा तालुका, जि. सोलापुर | मालदंडी जवार विकास संघ |
| ७ | वाघ्या घेवडा | कोरेगाव, व खटाव तालुका, जि. सातारा | जय तुळजाभवानी शेतकरी बचत गट |
| ८ | नवापुर तुरडाळ | नवापुर तालुका, जि. नंदुरबार | बळीराजा कृषक बचत गट |
| ९ | आंबेमोहोर तांदुळ | मुळशी, जि. पुणे | मुळशी तालुका आंबेमोहोर संवर्धन संघ |
| १० | वेंगुर्ला काजु | वेंगुर्ला , जि. सिंधुदुर्ग | कोंकण काजू समूह |
| ११ | सांगली बेदाणा | सांगली | महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ |
| १२ | लासलगाव कांदा | लासलगाव , जि.नाशिक | बळीराजा शेतकरी गट |
| १३ | डहाणु घोलवड चिक्कु | डहाणु जि. ठाणे | महाराष्ट्र राज्य चिकु उत्पादक संघ |
| १४ | बीड सिताफळ | बालाघाट, जि. बीड | बालाघाट सिताफळ संघ |
| १५ | जालना मोसंबी | जालना | जालना जिल्हा फळे व मोसंबी बागायतदार संघ |
| १६ | जळगाव केळी | जळगाव, | निसर्ग राजा कृषी विज्ञान केंद्र |
| १७ | मराठवाडा केशर आंबा | औरंगाबाद | मँगो ग्रोवर्स असोसिएशन |
| १८ | पुरंदर अंजीर | पुणे | अखिल महाराष्ट्र अंजीर उत्पादक संशोधन संघ |
| १९ | जळगाव भरिताची वांगी | जळगाव | नवनिर्मिती शेतकरी मंडळ |
| २० | सोलापुर डाळिंब, | सोलापुर | अखिल महाराष्ट्र डाळींब उत्पादक संशोधन संघ |
| २१ | हापुस आंबा, | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर | 1.कोकण हापूस आंबा उत्पादक आणि उत्पादक विक्रेते सहकारी संस्था मर्यादित.<br>2.देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था मर्या.<br>3.केळशी परीसर आंबा उत्पादक सहकारी संघ मर्या.<br>4.डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विदयापीठ, दापोली. |
| २२ | कोकम | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, | सिंधुदुर्ग रत्नागिरी महाकोकम संस्था |
| २३ | कोल्हापुर गुळ | कोल्हापुर | कोल्हापुर शेती उत्पन्न बाजार समिती. |
| २४ | भिवापुर मिरची | नागपूर | भिवापूर मिरची उत्पादक समूह गट |